महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

# जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपूर

जिल्हाधिकारीकार्यालयपरिसर,चंद्रपूर
दुरध्वनीक्रमांक : 07172-252738 e-mail- toaudit_chandrapur@mah.gov.in

क्र.कोषा/अंकेक्षण/कावि/ 103 /2025 दिनांक - ३० / 07 / 2025

प्रति,

मा. संचालक
लेखा व कोषागारे,
मुंबई

मार्फत :- मा. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर

विषय :- संदर्भिय शासन निर्णय क्र. ५ नूसार नक्षलग्रस्त भाग वगळल्यानंतर संदर्भिय शासन निर्णय क्र. ४ मधिल आदिवासी क्षेत्र असलेल्या गावांत कार्यरत कर्मचा-यांना एकस्तर अगर मूळ वेतन देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआएफ-२०००/प्र. शा. क्र. बारा, मंत्रालय मुंबई दिनांक ०६/०८/२००२.
२) शासन निर्णय,गृह विभाग,क्र.एनएएक्स.२००४/प्र.क्र.४८/वि.शा-१ ब दिनांक ०७/१२/२००४
३) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. एनएएक्स. २००५/प्र.क्र. १४/वि.शा-१ ब दिनांक २०/०५/२००५
४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. टिएसपी-१०८६/८७१०/प्र. क्र. ३१/का-५ मंत्रालय मुंबई दिनांक ०९/०३/१९९०
५) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.एनएएक्स. १२२०/प्र.क्र. २५३/वि.शा-१ ब दिनांक २७/०६/२०२५

महोदया,

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, संदर्भ क्र. १ अन्वये सामान्य प्रशासन विभागाने सदरच्या शासन निर्णयात मुदा क्र. ३ (७) मध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट 'अ' ते 'ड' मधील सर्व पदधाराकांना संबंधीत कर्मचारी/अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यन्तच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मुळ पदाच्या नजीकची वरीष्ठ/पदोन्नतीची वेतन श्रेणी व त्या अनुषंगाने वेतननिश्चीतीचा लाभ देण्यात यावा. ज्या कर्मचारी /अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे त्यांना आणखी वरीष्ठ पदाचा वेनतश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल. ही एकस्तर पदोन्नतीची योजना दिनांक १ जुलै २००२ पासून अंमलात येईल आणि ती संबंधीत कर्मचारी/अधिकारी आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच अनुज्ञेय राहील. त्या क्षेत्रातून

CamScanner

कर्मचारी / अधिकारी बिगर आदिवासी क्षेत्रात परत आल्यावर तो त्याच्या मुळच्या संवर्गातील वेतनश्रेणीत पूर्वीच्या वेतनाच्या अनुषंगाने वेतन घेईल अशी तरतुद आहे.

संदर्भ क्र. १ ला अनुसरुन गृह विभागाने दिनांक ०७/१२/२००४ व २०/०५/२००५ रोजी राज्यात जिल्हातील तालुके/गाव नक्षलग्रस्त घोषीत केलेले आहे. उपरोक्त संदर्भ क्र १, २ व ३ मधील तरतुदीचा एकत्रित विचार करता नागपूर विभागातील चंद्रपूर जिल्हातील तालुके/गाव नक्षलग्रस्त घोषीत केले असल्याने सद्यास्थितीत या क्षेत्रात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून एकस्तर पदोन्नतीची योजना १ जुलै २००२ पासुन अनुज्ञेय केली आहे.

परंतु संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयात आदिवासी विकास विभागाने महाराष्ट्रातील त्यावेळेच्या १४ जिल्हातील ६८ तालुक्यातील एकुण ६९६२ गावांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये करण्यात आल्याचे नमुद आहे. सदरच्या शासन निर्णयात चंद्रपूर जिल्हातील तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये एकुण ७४२ गावांचा समावेश आहे. (पृ. क्र. ४८ ते ५० व ७० ते ७९)

सबब उपरोक्त नमुद प्रमाणे संदर्भ क्र.४ मधील चंद्रपूर जिल्हातील व तालुक्यात आदिवासी उपयोजना क्षेत्र एकुण ७४२ गावांचा समावेश असलेल्या गावांनाच आदिवासी भाग गृहीत धरुन या क्षेत्रात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन म्हणून एकस्तर पदोन्नती योजना लागु करावी किंवा कसे ? की शासन स्तरावरुन चंद्रपूर जिल्हयात आदिवासी बहुल तालुका / गांवाची यादी प्रसिध्द झाल्यानंतरच सदरच्या क्षेत्रात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन म्हणून एकस्तर पदोन्नती योजना लागु करावी यासंबंधी स्पष्टतः नसल्याने संभ्रमाची स्थिती निर्माण झालेली आहे.

तसेच शा. नि. दि. ०६/०८/२००२ नुसार चंद्रपूर जिल्हातील नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्यात आली परंतू गृह विभाग यांचे शा. नि. दि. २७/०६/२०२५ नुसार घोषीत केलेल्या नविन नक्षलग्रस्त भागात चंद्रपूर जिल्हा हा पुर्णता वगळण्यात आलेला आहे. आपले मार्गदर्शन प्राप्त होईपावेतो संदर्भिय शासन आदेश क्र. ४ मध्ये नमूद तालुक्यातील गावांचा समावेश असलेले अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी न देता नियमीत वेतनावर देयके पारित करण्यात येत आहे.

संदर्भिय शासन आदेश क्र. ४ मध्ये चंद्रपूर जिल्हातील काही तालुक्यातील गावांचा समावेश आहे. अशा गावात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भिय शासन निर्णय १ अन्वये एकस्तर पदोन्नतीचा लाभ सुरू ठेवावे किंवा कसे याबाबत कृपया मार्गदर्शन करावे ही विनंती.

आपला विश्वासु

(सुहास हिं. पवार)
जिल्हा कोषागार अधिकारी
चंद्रपूर

सहपत्र :- वरील प्रमाणे

CS CamScanner